गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १९९ वा ● शनिवार ०९ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 199 | Date : 09/12/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4

## पिंपरी-चिंचवडमध्ये फटाक्याच्या गोदामाला भीषण आग, सहा जणांचा होरपळून मृत्यू



पिंपरी-चिंचवड : पिंपरी चिंचवडमध्ये मोठी आग लागली. आगीत सहा जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. पिंपरी-चिंचवडमधील तळवडे एमआयडीसीत असलेल्या फटाक्यांच्या गोदामाला आग लागली. काही वेळातच अग्निशमन दलाच्या जवानांना आग आटोक्यात आणण्यात यश आलं आहे. हे फटाका गोदाम विनापरवाना सुरू होते, असंही म्हटलं जात आहे. काहीवेळा पूर्वी लागलेल्या या आगीवर अग्निशमन दलाचे जवान नियंत्रण मिळवलं आहे. दुसरीकडे सात ते आठ रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल आहेत. आत्तापर्यंत सहा मृतदेह बाहेर काढण्यात आलेल्या आहेत, आणखी कामगारांचा शोध सुरु आहे. वाढदिवसाल्या लावण्यात येणाऱ्या स्पार्कल्सचा हा कारखाना होता. या लागलेल्या आगीत कारखान्यातील वस्तू जळून खास झाल्या आहेत.

या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. ते म्हणाले की, मृतांची नावे अद्याप समजू शकलेली नाही पोलीस घटनास्थळी दाखल झाली असून बचाव कार्य सुरू आहे वाढदिवसाच्या केक वर लावण्यात येणाऱ्या फुलझडी मेणबत्ती बनवण्याचा कारखान्यात ही दुर्घटना घडली आहे. काही कामगार गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

# राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना विधानपरिषदेकडून नोटीसा

## सात दिवसात उत्तर सादर करण्याचे आदेश

नागपूर : शिवसेना कोणाची? हा वाद शिंदे गट आणि ठाकरे गट यांच्यामध्ये गेल्या वर्षभरापासून सुरू असतानाच आता याच मार्गावरून राष्ट्रवादी कोणाची? या असा वाद रंगला आहे. आता या दोन्ही पक्षांची कायदेशीर लढाई सुरू आहे. दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज (८ डिसेंबर) विधान परिषदेकडून राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. सात दिवसांमध्ये उत्तर सादर करण्याचे आदेश या नोटिसांमधून देण्यात आले आहेत.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केलेल्या दाखल केलेल्या याचिकेनंतर या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. यामध्ये अजित पवार गटाचे आमदार सतीश चव्हाण, आदिती झटकरे, विक्रम काळे, अमोल मिटकरी यांना नोटीस पाठवण्यात आली आहे. शरद पवार गटाच्या जितेंद्र आवड यांच्या याचिकेवरून रामराजे नाईक निंबाळकर यांना नोटीस काढण्यात आली आहे. दरम्यान अजित पवार गटाकडून अमोल मिटकरी यांच्याकडून दाखल याचिकेत एकनाथ खडसे, शशिकांत शिंदे आणि अरुण लाड यांच्या नावाचा समावेश आहे. दोन्ही गटांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांमध्ये आपलं उत्तर । पान २ वर



## ठाकरे गटाचा मोठा पत्ता

### गुलाबराव ते उदय सामंत, केसरकर ते दादा भुसे, एकनाथ शिंदेंना हटवण्याच्या ठरावावर २३ जणांच्या सह्या

मुंबई : शिवसेना आमदार अपात्रता सुनावणी सुरू असून आज दोन सत्रांत सुनावणी पार पाडणार आहे. पहिल्या सत्रातील सुनावणीत ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांनी शिंदे गटाचे आमदार दिलीप लांडे यांची साक्ष घेतली. त्यावेळी ठाकरे गटाकडून मोठा पत्ता सादर केला गेला. दिलीप लांडेंच्या उलट तपासणी दरम्यान ठाकरे गटाच्या वकीलांनी एक अटेंडटशिट सादर केली. ही अटेंडट शीट २१ जून २०२२ रोजी वर्षा बंगल्यावर झालेल्या बैठकीची होती. या अटेंडटशिटवर, शिंदे गटातील तब्बल २३ आमदारांच्या सह्या आहेत. महत्त्वची बाब म्हणजे, । पान २ वर



## शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील चर्चेचा प्रस्ताव नाकारला; विधानसभेत विरोधकांचा कामकाजावर बहिष्कार



नागपूर : राज्यातील शेतकरी दुष्काळ, अवकाळी, गारपीट, मिचाँग वादळामुळे उद्ध्वस्त झाला असून सरकारच्या मदतीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे सभागृहात तातडीने चर्चा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करीत विरोधकांनी शुक्रवारी विधानसभेचे कामकाज रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्थगन फेटाळल्यामुळे नाराज झालेल्या विरोधकांनी कामकाजावर बहिष्कार टाकत संताप व्यक्त केला. तर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा करून सर्व सहमतीने मार्ग काढण्याची तयारी असून कांदा निर्यातबंदी आणि उसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीवरील बंदीचा फेरविचार करण्याची विनंती केंद्राला करण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून विरोधकांनी सलग दुसऱ्या दिवशी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. विधानसभेत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले, जयंत पाटील आदींनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची मागणी केली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री काल शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आलेत. शेतकऱ्यांची परिस्थिती त्यांच्या लक्षात आली असेल. राज्यात अवकाळीमुळे पिके वाया गेलीत. निर्यात बंदीमुळे आता कांदा उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरला आहे. सरकारने एक रुपयात पीक विमा उतरवला पण यात पीकविमा कंपन्यांना कोटय़वधींचा फायदा होत आहे. विम्याच्या हप्तय़ापोटी कंपन्यांना आठ हजार रुपये मिळाले असून शेतकऱ्यांना जेमतेम दोन हजार कोटींची नुकसानभरपाई मिळाली आहे. त्यामुळे विमा कंपन्यांना सहा हजार कोंटीचा फायदा झाला । पान २ वर


## ऑनलाईन फसवणुकीबाबत जलद प्रतिसादासाठी 'डायनॅमिक प्लॅटफॉर्म' तयार करणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : राज्यामध्ये प, संकेतस्थळे, विविध समाजमाध्यम पच्या माध्यमातून ऑनलाईन आर्थिक फसवणुकीचे प्रकार घडत आहेत. यामध्ये बरेचसे प विदेशातून संचालित करण्यात येत आहे. अशा ऑनलाईन फसवणुकीच्या प्रकारांवर आळा घालण्यासाठी सर्वंकष असा 'डायनॅमिक (गतिमान) प्लॅटफॉर्म' तयार करण्यात येत आहे. या माध्यमातून जलद प्रतिसाद मिळण्याची व्यवस्था होणार आहे. ही सर्व व्यवस्था एका पमध्ये असेल, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.



याबाबत अधिकची माहिती देताना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ए. एस. ट्रेडर्स व त्यांच्या अन्य कंपन्यांनी केलेल्या फसवणुकीबाबत दाखल गुन्ह्यांमध्ये वेगवेगळ्या राज्यांशी समन्वय करून तपास सुरू आहे. गुंतवणुकीचा पैसा विदेशात गेला असल्यास आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्यान्वये अंमलबजावणी संचालनालयाची मदत घेण्यात येईल. या गुन्ह्यामध्ये पहिले दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्याचबरोबर तपास पुढे जाईल त्यानुसार पुढील दोषारोप पत्रामध्ये आरोपींचा सहभाग वाढेल. याप्रकरणी संशयित आरोपींना विदेशात पळून जाण्यास कुठलीही मदत करण्यात आलेली नाही. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, याप्रकरणी आजस्थितीत । पान २ वर

## अग्निसुरक्षा लेखापरीक्षणासाठी भरारी पथके; उदय सामंत यांची घोषणा



नागपूर : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (एमएमआरडीए) सर्व उंच इमारती, व्यावसायिक अस्थापनांसह सर्व गृहनिर्माण सोसायटय़ांमधील अग्निसुरक्षा लेखापरीक्षण करण्यासाठी भरारी पथकांची स्थापना करण्यात येईल, अशी घोषणामंत्री उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली.विधान परिषदेत शुक्रवारी सदस्य प्रसाद लाड यांनी एमएमआरडीएतील आगीच्या विविध घटनांचा दाखल देत राज्य सरकार आणि महापालिका आगीच्या घटना टाळण्यासाठी काय उपाय योजना करणार आहे. संबंधित इमारतीत अग्निसुरक्षा लेखापरीक्षणाबाबत ठोस निर्णय घेणार आहे का. इमारतींचे मालक, भोगवटादार आणि गृहनिर्माण संस्थांनी अग्नी सुरक्षा लेखापरीक्षण करून घेतल्याची तपासणी कशी करणार आहात, अशी विचारणा केली होती. सरकारच्या वतीने उत्तर देताना मंत्री सामंत म्हणाले, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (एमएमआरडीए) सर्व उंच इमारतींचे इमारतींची अग्निसुरक्षा लेखापरीक्षण तपासणीसाठी आणि प्रत्यक्षात अग्निशमन यंत्रणा त्या इमारतीत आहे का याची खातरजमा करण्यासाठी भरारी पथके नेमली जातील. ही भरारी पथके अचानक भेटी देऊन तपासणी । पान २ वर




## तीर्थक्षेत्र विकास आरखाड्यासाठी ३६८ कोटींचा निधी

अक्कलकोट/प्रतिनिधी: तीर्थक्षेत्र विकासा अंतर्गत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी नुकतेच ३६८ कोटी रुपयाचा भरीव निधी राज्य सरकारकडून मंजूर करुन घेतलेले असून याकरिता नगरपरिषदेकडून पुण्याच्या वास्तु विशारद कंपनीची नियुक्ती करण्यात आल्याने विविध विकास कामांचे प्रस्ताव तयार करुन लवकरच जिल्हाधिकारी व त्यानंतर राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे मंजूरीकरिता पाठविले जाणार आहेत.

बहुचर्चित तीर्थक्षेत्र विकास आराखडा असून श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी वाढत चाललेली गर्दी पाहता विकास होणे गरजेचे आहे. याबाबत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रयत्न केल्याने सरकारने याबाबत तात्काळ दखल घेत ३६८ कोटी रुपयांच्या तीर्थक्षेत्र विकासाला मंजूरी मिळवून तात्काळ पूर्वतयारी म्हणून लागणार्या अनुषंगीय पूर्तता करण्याकामी नगरपरिषदेची टीम मुख्याधिकारी सचिन पाटील हे याकरिता सतत कार्यरत आहेत. या निधीमधून सुमारे रु.१०० कोटी हे भूसंपादनाकरिता खर्च होणार असल्याचे नगरपरिषदेच्या सूत्रांनी सांगितले आहे. उर्वरित २६८ कोटींची विकास कामे हाती घेतली जाणार आहेत.

श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी नियमित भाविकांची गर्दी होत असून या पार्श्र्वभूमीवर तीर्थक्षेत्र विकासाची कामे लवकरच हाती घ्यावेत. श्रीक्षेत्र अक्कलकोटमध्ये स्थानिक व तरंगती लोकसंख्याप्रमाणे तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत कामे घेण्यात आलेली आहेत. तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता ३६८ रुपयेचा विकास होत असताना गेल्या अनेक वर्षापासून भुयारी गटार योजना ही नगरपालिकेकडून प्रस्तावित आहे, मात्र त्यास अद्याप गती न मिळाल्याने सदर प्रस्ताव लालफितीत अडकलेला आहे. याकरिता नगरोत्थामधून विशेष निधी मिळाला पाहिजे. याकरिता प्रयत्न होणे गरजेचे आहे.

### दुर्गंधीमुळे भक्तांतून तीव्र संताप :

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, मैंदर्गीकडे जाणार्या मार्गावर पर्यटन विकास महामंडळाने अर्धवट स्थितीत ठेवलेल्या पूलाचे काम नगरपरिषदेने पूर्ण केले. मात्र पुलाजवळील दुर्गंधी अद्याप गेलेली नसून परिसरात पसरत असलेल्या दुर्गंधीने स्थानिकासह भक्तांतून तीव्र संताप व्यक्त केले जात आहे.

### ५० कोटी खर्चुन पाण्यात :

पर्यटन विकास महामंडळाने शहरातील गट नं.७०८ मध्ये बांधण्यात आलेल्या रिसॉर्ट व गेस्ट हाऊस अद्यावत स्वरुपात बांधण्यात आलेले असून लोकार्पणा अगोदरच मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. याकडे राज्य सरकार लक्ष देईल? अशी भावना व्यक्त होत आहे.

### अन्नछत्र मंडळामुळे रु.२१ कोटी वाचले :

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने काही दिवसापूर्वी मंडळाच्या परिसरातील गट नं.५८७/१ ही तीन एकर जमीन खरेदी केलेली आहे. तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत या जागेवर पार्किंग विकसित होणार होते. तीच सुविधा अन्नछत्र मंडळाकडून करण्यात येणार असल्याने तीर्थक्षेत्र विकास निधीतील अन्नछत्र मंडळाने रु.२१ कोटी वाचणार आहेत. यामुळे नगरपरिषदेला अन्य विकास कामांना सदरचा निधी शासन मान्यतेने वापरता येणार असल्याने, नेहमीचच न्यासाकडून राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था यांना मदतीचा हात असतोच, न्यास हे विकासाकरिता सतत आग्रही सकारात्मकता भूमिका असते. न्यासाकडून सदर तीन एकर जागेवर अद्यावत पार्किंग व्यवस्थेचे काम सुरु केले असून अंतिम टप्प्यात आलेले आहे.

## गरज श्रेया चे नाही पाण्याची आहे.अगोदर लोकांना पाणी द्या : राजाभाऊ सरवदे

अक्कलकोट/प्रतिनिधी: अक्कलकोटकराला श्रेया ची गरज नाही पाण्याची गरज आहे. श्रेय लाटण्या अगोदर लोकांना पाणी द्या-असे मत रिपाइं(आठवले गट) चे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी व्यक्त केली आहे.

अक्कलकोट रिपाइं(आठवले गट)च्या वतीने तहसिल कार्यालया समोर उजनी धरणातील पाणी अक्कलकोट तालुक्यातील शेवटच्या केटिव्हेअर बबलाद गावाला सोडण्यात यावे यासाठी अमरण उपोषण सुरु केली आहे. सरवदे यांनी उपोषण स्थळी भेट देऊन बोलत होते. अन्यथा रिपाइं (आठवले गट)अक्कलकोट च्या वतीने उद्या गुरुवार दि.०७ डिसेंबर रोजी सां.४-००वा पासून तहसिल कार्याल अक्कलकोट यांच्या समोर अमरण उपोषणास प्रारंभ केली.आज दुसरा दिवस चालु आहे.




उजनी पाण्याविना अक्कलकोटच्या शेतकरी वाट पाहात असून दिग्गज नेते मंडळीने आतापर्यंत आश्र्वासना शिवाय काहीही केली नाहीं म्हणून ही आक्रमक भूमिका रिपाइं ने उचलली आताही दखल घेतली नाही तर पुढे याहीपेक्षा उग्र आंदोलने तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यात छेडण्याचा इशारा यावेळी राजाभाऊ सरवदे यांनी दिला आहे. यावेळी ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे,जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,सचिव सोपान गायकवाड,सुग्रीव जेठीथोर,युवक ता अध्यक्ष अप्पा भालेराव,अजय मुकणार,रिपाइं मुस्लिम आघाडी शहर अध्यक्ष सैपन शेख,ता कार्याध्यक्ष राजु बोरगाव,ता कोषाध्यक्ष अंबादास गायकवाड, युवक चे शहर सरचिटणीस शुभम मडिखांबे, सचिव राजू भगळे,रमेश धोडमनी,गोरखनाथ धोडमनी,दत्ता कांबळे,शिवानंद धोडमनी,धहुच्चप्पा गायकवाड,तमा धसाडे,सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# संपादकीय

## चांगले योगदान देऊ शकतील.

जगातील दहा टक्के लोकसंख्या म्हणजेच सुमारे ६७ कोटी लोक या ना त्या कारणाने दिव्यांग आहेत. महाराष्ट्रात तीन कोटी दिव्यांग बांधव आहेत. भारताच्या बाबतीत विचार करायचा झाल्यास २०१४ साली देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी झाले. त्यानंतर दिव्यांगांना 'अच्छे दिन' येतील, असा आशेचा किरण चमकला. अपेक्षेप्रमाणे पंतप्रधानांनी दिव्यांग कल्याणासाठी प्रयत्न केलेदेखील. विशेष व्यक्तींना अपंग या शब्दाऐवजी दिव्यांग अशी ओळख दिली. २०१६ मध्ये देशात मोदी सरकारने नवीन दिव्यांग हक्क कायदा मंजूर केला. देशात आणि राज्यात दिव्यांगांसाठी असलेल्या जुन्या योजना आणि काही नव्या योजनांची अंमलबजावणी सुरू झाली. त्यानुसार अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिव्यांग नोंदणी होऊ लागली. २०१६ आधी देशात दिव्यांग या प्रवर्गात केवळ सहाच प्रवर्ग होते, परंतु मोदी सरकारने नवीन २१ प्रकारचे दिव्यांग प्रवर्ग तयार केले. त्यामुळे हे सरकार दिव्यांगांचे कल्याण करणारे सरकार आहे, असा विचार रुढ होत असतानाच स्मार्ट सिटीची संकल्पना पंतप्रधानांनी देशभर आणली. यात शहरांमधील पसारा कमी करून ते स्मार्ट करण्याकडे कल होता. 'स्मार्ट सिटी' प्रस्तावात अनेक विधायक बाबींचा समावेश केला. परंतु, शहरांना चकाचक करण्याच्या नादात दिव्यांगांकडे पूर्णत: दुर्लक्ष झाले. स्मार्ट सिटी योजनेत दिव्यांग नागरिकांचा ज्यात अंध, अस्थिव्यंगबाधित, मूकबधिर, गतिमंद व्यक्ती आणि विद्यार्थ्यांसाठी कुठलेही धोरण आखले नाही. त्यामुळे दिव्यांग बांधवांचा या धोरणाने हिरमोडच केला. आधीच परिस्थितीने पिचलेले हे बांधव सरकारी धोरणामुळे अधिक व्यथित झाले. दिव्यांग व्यक्ती अनेक योजनांपासून वंचित राहिलेल्या आहेत. आता शहरे स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत असताना महापालिकेने दिव्यांगांसाठी योग्य प्रकारे योजना राबविणे गरजेचे आहे. केवळ योजना जाहीर करून भागणार नाही, तर योजनांची नेटकी अंमलबजावणी करावी लागेल. शहरे स्मार्ट होत असताना त्यात सक्षम झालेल्या दिव्यांग नागरिकांनाही सहभागी करून घेतल्यास दिव्यांग नागरिकांना शहरांविषयी अधिक आत्मीयता वाटेल. त्यातूनच ते भविष्यात विकसित शहरांसाठी त्यांचेही चांगले योगदान देऊ शकतील.

# चला डॉ.बाबासाहेबांच्या विचाराची पेरणी करू

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते, समतावादी व्यवस्था प्रस्थापित करणारे समतेचे शिल्पकार, हजारो जातींना एकत्र सुखा समाधानाने नांदायला लाऊन जाती धर्माच्या पलिकडे माणसाला माणसाचा दर्जा, सन्मान देऊन भारतीय ओळख देणारे मानवतेचे व समतेचे कैवारी, स्त्रियांना सर्व प्रकारचे हक्क अधिकार बहाल करून स्त्रियांना पुरूषांपेक्षा वेगळे न समजता स्त्रीपुरूषांना समान अधिकार, समान दर्जा, समान संधी व समान हक्क अधिकार देणारे व महिलांच्या विकासासाठी हिंदू कोडबिलाला विरोध होतो म्हणून मंत्रीपदाचा राजीनामा देणारे भारतीय महिलांचे खरे उद्धारक, सर्वच विषयांत ज्ञान मिळवून स्वतः बरोबर देशाचे नाव उंचावून बुद्ध अर्धात बुद्धीचे प्रतिक हेच पुन्हा एकदा साध्य करून जगातील सर्वात विद्वान विद्यार्थांचा बहुमान मिळवून जागतिक ज्ञानाचे प्रतिक ठरलेले सर्व श्रेष्ठ विद्वान, मानसिक गुलामी, अंधविश्र्वास व विषमतेच्या बेडीतुन मानवाला मुक्त करून मानवी स्वातंत्र्य बहाल करणारे, मानवाचे हक्क अधिकार सुरक्षित करून त्यांना संरक्षण देणारे आणि देशाला सार्वभौम बहाल करणाऱ्या संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर आजही बहुसंख्य लोकांना समजले नाही हि शोकांतिका आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल दोन मोठे गट मोठ्या प्रमाणावर आज दिसून येतात पहिला गट डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना स्वतः ची मालकी समजून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल भावनिक होऊन जयजयकार करतो तर दुसरा गट आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान घरात आणत नाही आणि वाचत नाही. दोन्ही विरुद्ध विचारसरणीचे लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांची चळवळ मागे ओढत आहेत. कारण एक समुह निव्वळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेऊन नाचत आहे तर दुसरा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार मानायला तयार नाहीत दोन्ही प्रकारचे लोक देशासाठी व देशातील मानसासाठी घातक आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे अनुयायी हे वैचारिक असतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी जाती धर्मापलिकडे जाऊन विचाराचा स्विकार करून त्याचा प्रचार आणि प्रसार करतात. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेतलेल्या लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पाहिजे तसे स्विकारले नाही. आणि काहिंनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार वाचले नाही म्हणजे वैचारिक पातळीवर दोन्ही गट मागासलेले च आहेत. परंतु या दोन्ही गटाच्या मध्ये एक गट आहे जो सतत डॉ बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान, जनकल्याण, राष्ट्रहित व नागरिकांचे हक्क अधिकार याबाबद जागृती करत असतो. आणि हाच गट खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी आहे असे माझे मत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर जातीचे आहेत म्हणून माणणारा गट आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर जातीचे नाहीत म्हणून त्यांच्या विचारापासून दुर गेलेला गट हा भारतीय संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अर्थातच फुले शाहु आंबेडकरवादी चळवळीच्या फायद्याचे नाहीत. कारण या दोन्ही गटाला डॉ बाबासाहेब आंबेडकर समजले नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेण्यासाठी अगोदर आपल्याला डोक्यातील विषमता, उच्च निच्चता व भेदभाव बाजूला सारून माणसाचा माणूस म्हणून स्विकार करता आला पाहिजे. जो व्यक्ती माणसाला माणूस म्हणून स्विकारत नसेल तो माणूस राष्ट्रहीतासाठी घातक असतो मग कोणत्याही जाती धर्माचा असो. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती अंताची लढाई लढून माणसाचे अस्तित्व निर्माण करून सर्वांना भारतीय केले आणि आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख करून जातीचा गर्व व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेता स्वतः ला वरच्या जातीमधील समजने म्हणजे आपल्या डोक्यातील वरचा मजला रिकामा असल्याचे सिद्ध करणे होय. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येक विचार व कार्य हे कधीच एका जातीला, धर्माला उद्देशून नव्हते तर समस्त मानवाच्या कल्याणासाठी होते. परंतु त्यांचे विचार समजून न घेतल्याने देशाचे लोकांचे खुप मोठे नुकसान झाले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला मताधिकार देऊन देशाचा राजा होण्याची व राजा निवडण्याची संधी निर्माण करून देखील आजही आम्ही आमचे खरे प्रतिनिधी निवडू शकत नाही याचा अर्थ मताधिकार आणि त्याचे गांभीर्य लोकांना आजही कळाले नाही. आणि याचेच दुष्परिणाम आज बघत आहोत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेऊन मिरवणारा बौद्ध, दरवर्षी करोडो रुपयांची पुस्तके खरेदी करणारा बौद्ध यांना आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कळाले नाही. जर कळाले असते तर शेकडो करोडो रुपयाच्या पुस्तकातुन खरे विचार बाहेर पडून किमान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे काही तरी आमदार खासदार असायला पाहिजे होते पण तसे काही दिसत नाही. ज्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व विचार वाचले नाही त्यांनी जाती धर्माच्या व नातेसंबंधावरून लोक निवडून दिले त्या लोकांनीही समाजाकडे न बघता स्वतः ची घरे भरायला सुरवात केली. यातून जनता त्रस्त आणि लोकप्रतिनिधी मस्त झाले. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मताधिकाराची जाणीव असती आणि त्यांचे विचार स्विकारले असते आणि जात धर्म नाते संबध न बघता त्या व्यक्तीची काम करण्याची क्षमता व प्रामाणिक पणा बघुन निवडून दिले असते तर आज समस्या सुटल्या असत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला महत्वपूर्ण संदेश म्हणजे शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा. हा संदेश कोणासाठी होता? हेच लोक विसरून गेले. शिक्षण तत्कालीन महार आणि आजच्या बौद्धांनाच आवश्यक आहे का? संघटन फक्त बौद्धांनाच पाहिजे का? आणि संघर्ष केवळ बौद्धच करतात का? समान समस्येसाठी जाती धर्माचा विचार न करता शिकलेल्या लोकांनी अर्थात जागृत लोकांनी संघटीत होऊन संघर्ष केला तर जनकल्याण साध्य होते पण परंतु आजही बरेच शिकलेले लोक अडाणी व स्वार्थी नेत्यांच्या मागे फिरतात तेव्हा त्यांच्या शिक्षणाची किव येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अजून एक संदेश दिलेला होता तो म्हणजे जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा आपल्याला शासनकर्ती जमात बनायचे आहे. हा संदेश थोडा फार फक्त बौद्ध लोकांनी मनावर घेतला पण इतरांना शासनकर्ते बनायचे नाही का? इतरांना शासनकर्ते यांचा अर्थ कधी कळणार? सध्याचे उदाहरण घ्यायचे तर मराठा समाजाचे आमदार खासदार मंत्री मुख्यमंत्री असुनही मराठा समाजा कडून एकही नेता बोलत नाही तर याला मराठ्यांची सत्ता म्हणायची का? मराठ्यांच्या खांद्यावर बंदुक ठेवून कोण सत्ता चालवत आहे हे ओळखता आले पाहिजे तरच आपण जागृत झालो असे सिद्ध होईल. शासनकर्ती जमात झाल्यावर त्या जमातीचे प्रश्र्न सुटलेले असतात. म्हणजे आपल्या शिक्षण, आरक्षण, हक्क अधिकार, व देशाचा कारभार समजून घ्यायचा असेल तर अगोदर आपल्याला संविधान वाचुन समजून घेणे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जनकल्याणाचे विचार समजून घेणे आवश्यक आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे मी प्रथम भारतीय आणि शेवटी ही भारतीयच आहे.हेच बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रत्येकाच्या मनात रूजले तर देशात कधीच जाती धर्माच्या नावावर दंगल होऊन कधीच जाती धर्माचा गर्व करण्याची वेळ येणार नाही कारण सार्वजनिक ठिकाणी आमची ओळख जाती धर्मावरून नाही तर कर्मावरून भारतीय ठरते. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही धर्माचे विरोधक नव्हते. उलट दोन भाऊ ज्या घरात सुखाने राहु शकत नाहीत त्या देशात हजारो जाती, भाषा, वेशभूषा, खाणपान, संस्कृती वेगवेगळे असणाऱ्या लोकांना भारतीय नावाखाली एकत्र केले पण त्यांच्या धर्मावर कोणतेही बंधने न लादता प्रत्येकाला आपल्या वैयक्तिक जिवनात धर्माचे पालन करणे, उपासना करणे याचे स्वातंत्र्य दिले. परंतु धर्म हा सार्वजनिक ठिकाणी इतरांवर थोपवू नये म्हणजे भारत व भारतीय ओळख कायम राहील असे सर्वश्रेष्ठ संविधान आहे. अनेक लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले त्यांना हिंदु विरोधी ठरवण्याचा प्रयत्न करतात. परंतु तेच बाबासाहेब आंबेडकर मनुस्मृती चे दहण रायगडाच्या पायथ्याशी का करतात, संत तुकाराम महाराज यांचे अभंग वृतपत्राच्या मुख्य भागावर का छापतात, यावर कोणी बोलत नाही. उलट तुकाराम महाराज, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यांनी तर धर्मांतर केले नाही मग त्यांचे तरी विचार मानतात का? थोडक्यात काय तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची खरी पेरणी होणे आवश्यक आहे. आणि हि पेरणी करण्यासाठी सर्व वैचारिक लोकांनी एकत्र येऊन, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेणारे कोणाबद्दल काय बोलतात किंवा डॉ बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी वाचलेच नाही ते काय बोलतात याचा विचार न करता आपण दोघांमध्येही जागृती निर्माण व्हावी म्हणून विचाराची पेरणी एकत्र येऊन करून तरच देश व देशातील जनता समृद्ध होईल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मताधिकार आज शुन्य झाला आहे. म्हणून समस्या वाढत आहेत. ईव्हिएम ला विरोध करून लोकशाही जतन करण्यासाठी व विचाराची पेरणी करण्यासाठी वैचारिक लोकांनी एकत्र यावे. तरच देश टिकेल.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना ..

सादर करण्याचा आदेश या नोटीसमधून देण्यात आला आहे.

नोटीसीमध्ये पक्षांतराच्या कारणावरून सदस्यत्व रद्द करण्यासंदर्भात उल्लेख असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विधान परिषद सदस्य नियम १९८६ अंतर्गत आपलं म्हणणं लेखी स्वरुपात सात दिवसात देण्याचे उपसभापती यांनी विधानसभा परिषद सदस्यांना निर्देश दिले आहेत. सात दिवसांमध्ये उत्तर न आल्यास आपलं याबाबत काहीचं म्हणणं नसल्याचे गृहित धरून सदस्यत्व रद्द करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल, असाही नोटीसमध्ये उल्लेख करण्यात आला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी कोणाची? यावर निवडणूक आयोगात सुनावणी सुरु आहे. अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगात भूमिका मांडण्यात आली आहे. अजित पवार आणि शरद पवार गटाचा एकमेकांवर बनावट शपथपत्रं सादर केल्याचा आरोप केला आहे. राष्ट्रवादी पक्षाची स्थापना शरद पवारांनी केली, मग त्यांच्याशिवाय पक्ष कसा काय असू शकतो असा सवाल शरद पवार गटाचे वकिल अभिषेक मनु सिंघवी यांनी उपस्थित केला आहे. दुसरीकडे, सुप्रिया सुळे यांच्या कार्याध्यक्षपदाची नियुक्ती चुकीची असल्याचा युक्तिवाद अजित पवार गटाकडून करण्यात आला आहे.

## गुलाबराव ते उदय सामंत, केसरकर ..

या बैठकीत एकनाथ शिंदे यांना गटनेता पदावरून हटवण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात आला होता, ज्याला या आमदारांनी अनुमोदन दिलं होतं.

२१ जून २०२२ रोजी वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत पक्षादेशानुसार किती आमदार उपस्थित होते? उलट तपासणी दरम्यान वारंवार येणाऱ्या प्रश्र्नावर ठाकरे गटाने शिंदे गटाच्या साक्षीदाराला आज २१ जून २०२२ च्या बैठकीची अटेंडन्स शीट दाखवली आहे. ही अटेंडन्ट शीट ठाकरे गटाकडून प्रतिज्ञापत्रात दाखल करण्यात आली होती.

ठाकरे गटाकडून प्रतिज्ञापत्रात दाखल करण्यात आलेल्या या अटेंडंटशिटनुसार, सुनील प्रभू यांच्याकडून व्हीप जारी करून २१ जून च्या बैठकीसाठी हजर राहण्याचे सूचना होत्या. या २१ जून २०२२ रोजी झालेल्या बैठकीत एकूण २३ आमदारांनी उपस्थिती दर्शवली होती आणि त्यांच्या अटेंडन्स शीटवरील सह्या या संबंधित शिवसेना शिंदे गटात गेलेल्या आमदारांनीच केल्या होत्या का? असा सवाल शीट दाखवून ठाकरे गटाकडून विचारला जाणार आहे.

या बैठकीत सध्या शिवसेना शिंदे गटात असलेले गुलाबराव पाटील, संजय राठोड, संतोष बांगर, दादा भुसे, दिलीप लांडे, मंगेश कुडाळकर, सदा सरवणकर, योगेश कदम, उदय सामंत, दीपक केसरकर हे सर्व आमदार उपस्थित होते, अशा प्रकारच्या सह्या या अटेंडंटस शीटवर आहेत. याच बैठकीमध्ये आपण उद्धव ठाकरे यांच्या सोबत आहोत आणि गटनेता म्हणून एकनाथ शिंदे यांना गटनेचे पदावरून हटवण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात आला ज्याला या आमदारांनी अनुमोदन दिलं. आता याच मुद्द्यावरून शिवसेना ठाकरे गटाची वकील उलट तपासणी मध्ये प्रश्र्न उपप्रश्र्न विचारून अडचणीत टाकण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे. दिलीप लांडे यांनी आपल्या साक्षीमध्ये यावर केलेली सही आपलीच असल्याचं कबूल केला आहे, पण त्यामध्ये वरती लिहिण्यात आलेल्या पक्षादेश क्रमांक हा आमच्या सह्या घेतल्यानंतर घेण्यात आला असं त्यांनी म्हटलं आहे.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील चर्चेचा

असून सरकार ही योजना कोणासाठी राबवत आहे अशी विचारणा वडेट्टीवार यांनी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्र्नांवर चर्चा व्हावी. अशी मागणी वडेट्टीवार आणि नाना पटोले यांनी केली.

नागपूर : अवकाळी पावसामुळे झालेले शेतकऱ्यांचे नुकसान आणि मराठा आरक्षण या मुद्द्यांवर सरकारला घेरण्याची योजना महाविकास विकास आघाडीने आखली आहे. शुक्रवारी नागपुरात झालेल्या आघाडीच्या बैठकीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेण्यात आली. पुढील आठवडय़ात याच मुद्द्यांवर चर्चा करण्याची विनंती करण्यात आली. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नेत्यांची आज विधान भवन परिसरातील दालनात बैठक झाली. या वेळी सरकारला हिवाळी अधिवेशनात शेतकरी आणि मराठा आरक्षणांवरून घेरण्याचे डावपेच आखण्यात आले.

## ऑनलाईन फसवणुकीबाबत जलद

तपासात एकूण ३५ आरोपी निष्पन्न झाले आहे. त्यापैकी १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. विदेशातून संचालित करण्यात येणाऱ्या पच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्यात येत आहे. याबाबत केंद्र शासनही त्यांच्या आयटी कायद्यामध्ये बदल करत आहे. तसेच राज्य शासनाने 'डायनॅमिक प्लॅटफॉर्म' तयार करण्यासाठी निविदा काढल्या आहेत. त्याला अनेक जागतिक कंपन्यांचा प्रतिसादसुद्धा मिळाला आहे. आर्थिक फसवणुकीच्या गुणांवर आळा घालण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेत 'फायनान्शिअल इंटेलिजन्स' ची व्यवस्था करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात काही पोलीस परिक्षेत्र व आयुक्तालय अंतर्गतही व्यवस्था उभारण्यात येईल. त्यानंतर प्रतिसाद बघून व्यवस्थेचा विस्तार करण्यात येईल. आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये मुख्य आरोपीसह अन्य सहभागी लोकांना सहआरोपी करण्यात येते. त्यामुळे कुणालाही सोडण्यात येत नाही.

ते पुढे म्हणाले की, लोकप्रतिनिधींसोबत अनेक नागरिक छायाचित्रे काढत असतात. त्याला लोकप्रतिनिधी विरोधही करू शकत नाहीत. राज्यात लोकप्रतिनिधींसोबत छायाचित्रे काढून फसवणूक करण्याचे प्रकारही वाढत आहेत. अशा प्रकारे लोकप्रतिनिधींसोबतचे छायाचित्र दाखवून पैसे मागितल्यास नागरिकांनी सहकार्य करू नये, असे आवाहन यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.या चर्चेत विधानसभा सदस्य आशिष शेलार, जयंत पाटील, नाना पटोले, गणपत गायकवाड, विकास ठाकरे यांनी सहभाग घेतला.

## अग्निसुरक्षा लेखापरीक्षणासाठी भरारी

करतील. अनेकदा सरकारी यंत्रणेमार्फत अग्निसुरक्षा लेखापरीक्षण झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात येते. पण, प्रत्यक्षात लेखापरीक्षण केले जात नाही. अशी बोगस प्रमाणपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. सर्व उंच इमारतींचे वर्षांतून दोन वेळा अग्निसुरक्षा लेखापरीक्षण करण्याचे आदेश देण्यात येतील, अशी घोषणाही सामंत यांनी केली.

सदस्य सचिन अहिर यांनी आक्षेप घेत मंत्री फक्त घोषणा करतात, आश्र्वासने देतात. प्रत्यक्ष कार्यवाही होत नाही, असा आरोप केला. मागील अधिवेशनात झालेल्या चर्चेनुसार त्यांनी मॉलच्या अग्नी सुरक्षा लेखापरीक्षणाच्या अहवालाचा तपशील दिला नाही. अनेक मॉलच्या टेरेसवर हॉटेल आहेत, अशा ठिकाणी अग्निशमन व्यवस्था कशी करणार. मुंबईत शंभर मजल्याच्या इमारती झाल्या आहेत. अशा इमारतींमधील आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी हेलिकॉप्टरचा वापर करण्याबाबतचा निर्णय घेण्याची गरज आहे, असे मत मांडले.

सदस्य जयंत पाटील यांनी राज्यासाठी एकच धोरण राबविण्याची मागणी केली. सदस्य प्रवीण दरेकर यांनी बोगस प्रमाणपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली. सदस्य अनिल परब यांनी सरकारने ठोस धोरणात्मक निर्णय घ्यावा, विरोधी पक्षाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही दिली.

# केंद्र शासन पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीला गती द्यावी : मुख्य सचिव मनोज सौनिक



नागपूर : केंद्र शासन विविध लोकहितपयोगी योजना राबवित असते. अशा केंद्रपुरस्कृत योजना राज्यातही राबविण्यात येतात. या योजनांच्या अंमलबजावणीला गती देण्यात यावी, असे निर्देश मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी दिले. नागपूर येथील हैदराबाद येथील हाऊस मुख्य सचिव कार्यालयात केंद्र शासनाच्या विविध योजनांचा आढावा मुख्य सचिव श्री. सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत घेण्यात आला. बैठकीला मुख्य सचिव कार्यालयाचे सहसचिव मकरंद देशमुख यांच्यासह विविध विभागांचे सचिव उपस्थित होते.आयुष्मान भारत योजनेची माहिती ऑनलाइन पोर्टलला योग्य पद्धतीने भरण्याच्या सूचना करीत मुख्य सचिव श्री. सौनिक म्हणाले की, ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेली कामे पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा. जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण करावी. त्यासाठी केंद्र शासनाने दिलेला निधी प्राधान्याने खर्च करावा. भारतनेट बाबत स्थानिक स्तरावरील प्रश्र्न सोडवण्यासाठी कृषी, आरोग्य, शिक्षण, महसूल व इतर संबंधित विभागांची बैठक बोलवावी. तसेच मुख्य सचिव श्री सौनिक यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना, आयुष्मान भारत, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री आवास योजना, भारतनेट या योजनांचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या. बैठकीला संबंधित विभागांचे अधिकारीसुद्धा उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील रस्ते व पूल मजबुतीकरणासाठी ८९ कोटी रुपये निधी मंजूर : आ.आवताडे

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील विविध भागांना जोडणाऱ्या रस्ते व पुलाचे मजबुती व सुधारणा करणे कामांसाठी राज्याच्या हिवाळी अधिवेशनामध्ये राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.रवींद्र चव्हाण व पालकमंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या माध्यमातून पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील रस्ते, पुल व सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयास ८९ कोटी रुपये निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे.

पंढरपूर व मंगळवेढा मतदारसंघातील दळणवळणच्या दृष्टिनी रस्ते, पूल गेल्या अनेक दिवसांपासून मजबूत व दुरुस्त करणे अतिशय गरजेचे होते. सदर रस्त्याने दररोज दळणवळण करत असणाऱ्या नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या प्रवास सुखकर करण्यासाठी हे रस्ते सुधारित करण्यात यावेत यासाठी आमदार आवताडे यांनी संबंधित विभागाकडे आर्थिक तरतूद करण्याची मागणी पत्राद्वारे केली होती. आमदार आवताडे यांनी केलेल्या या मागणीची राज्य पातळीवर दाखल घेऊन हिवाळी अधिवेशनामध्ये निधी मंजूर झाल्याने या रस्त्यांचा कायापालट होण्यास खूप मोठी मदत होणार आहे.

**पंढरपूर – मंगळवेढा मतदारसंघातील मंजूर असलेले कामे**

गुंजेगाव आंधळगाव पाटखळ नंदेश्र्वर भोसे हुन्नुर रेवेवाडी रस्ता रा.मा. ३९१ कि.मी. ७६/०० ते ७८/५०० ( भाग – भोसे ते हुन्नुर ) मध्ये सुधारणा करणे.

सिद्धेवाडी ते चिचुंबे रस्ता ग्रामा ४३ किमी ०/००० ते २/५००, मध्ये सुधारणा करणे.

बोराळे, अरळी ते दसुर रस्ता प्रजिमा – ६२ कि.मी. ००/०० ते ४/०० मध्ये सुधारणा करणे.

शिरबावी उंबरगाव टाकळी पंढरपुर रस्ता रामा ३८८ किमी १७/५०० ते १९/००० ( भाग – उंबरगाव ते बोहाळी ) व २१/५०० ते २४/५०० ( भाग – बोहाळी ते टाकळी ) मध्ये सुधारणा करणे.

गुंजेगाव आंधळगाव पारखळ नंदेश्र्वर भोसे हुन्नूर रेवेवाडी रस्ता रा.मा. ३९१ कि.मी. ७८/५०० ते ८०/१८० ( भाग – हुन्नूर ते जिल्हा हद्द ) मध्ये सुधारणा करणे.



कासेगाव ते तावशी रस्ता ग्रामा ४६ किमी ०/००० ते ५:०० मध्ये सुधारणा करणे.

लक्ष्मी दहीवडी आधळगाव पाटखळ हाजापुर भाळवणी तळसंगी ते रा.म. ५६१ अ ला जोडणारा रस्ता प्रजिमा – ७४ कि.मी. १०/१०० ते १२/६०० ( पेट्रोलपंप ते आधळगाव (व कि. मी. १९/०० ते २०:०० ( पाटखळ शाळेपासून पुढे ) मध्ये सुधारणा करणे.

कासेगाव ते तपकिरी शेटफळ रस्ता ग्रामा ६७ किमी ०/००० ते ७/०० मध्ये सुधारणा करणे.

धर्मगाव ढवळस मल्लेवाडी घरनिकी मारापूर गुजेगाव लक्ष्मी दहीवडी रस्ता प्रजिमा – ७६ कि.मी. ८/२०० ते १३/०० (घरनिकी ते मारापूर) मध्ये सुधारणा करणे.

उंबरगाव ते खर्डी रस्ता ग्रामा ५४ किमी ०/००० ते ४/५०० मध्ये सुधारणा करणे.

गोपाळपुर मुंढेवाडी चळे आबे सरकोली प्रजिमा ११२ किमी ६/२०० ते ७/५०० ( भाग – मुंढेवाडी ते चळे ) मध्ये सुधारणा करणे.

रा.म. ५६१ अ ते सोड्डी चडचण रस्ता प्रजिना – १५८ कि.मी. ००/०० ते ४/६०० मध्ये सुधारणा करणे.

टाकळी कासेगाव अनवली रांझणी रस्ता प्रजिमा ८३ किमी ११/५०० ते १२/५०० व १४/००० ते १५/००० ( भाग – अनवली ते रांझणी ) मध्ये सुधारणा करणे.

रा.म. १६६ ते कचरेवाडी रस्ता प्रजिमा १५९ कि.मी. २/७०० ते ३/२०० ( कचरेवाडी गावाजवळील ) मध्ये सुधारणा करणे.

खेड भाळवणी बाजीराव विहीर गादेगाव कोर्टी बोहाळी खर्डी तनाळी रस्ता रामा ३९१ किमी २५/२०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे.

बोराळे सिध्दापूर तालुका हद्द रस्ता प्रजिमा – ६३ कि.मी. ६/०० ते ९/५०० मध्ये सुधारणा करणे.

वाखरी ते वडाचीवाडी ग्रामा ९२ रस्ता किमी ०/००० ते ३००० मध्ये सुधारणा करणे.

लक्ष्मी दहीवडी म्हसोबा देवस्थान ते तालुका हद्दीपर्यंत रस्ता ग्रामा – ३१३ कि.मी. ००/०० ते १/५०० मध्ये सुधारणा करणे.

कौठाळी ते जोडरस्ता (ग्रा. मा. ४७) ग्रामा ५१ रस्ता किमी ०/००० ते ४/५०० मध्ये सुधारणा करणे.

आवताडेवाडी ते नंदेश्र्वर रस्ता ग्रामा ६५ कि.मी. ००/०० ते ७/५०० मध्ये सुधारणा करणे.

उपरी ते गादेगाव रस्ता ग्रामा ६० किमी ३/००० ते ५/००० मध्ये सुधारणा करणे.

चिक्कलगी ते मारोळी रस्ता ग्रामा ६७ कि.मी. ००/०० ते ७/०० मध्ये सुधारणा करणे.प्रजिमा – ७६ लक्ष्मीदहीवडी गुंजेगाव तनाळी कासेगाव ते पंढरपूर रस्ता प्रजिमा– १६८ कि.मी.४३/०० ते ४५/२०० (भाग– पंढरपूर ते कासेगाव) मध्ये सुधारणा करणे,

जुनोनी ते नंदेश्र्वर रस्ता यामा ६२ कि. मी. ००/०० ते ५/०० मध्ये सुधारणा करणे.

लवंगी ते उमदी रस्ता ग्रामा ९७ कि.मी. ००/०० ते २०० मध्ये सुधारणा करणे.

फटेवाडी ते रा.म. ५६१ अ ला जोडणारा रस्ता ग्रा.मा. ४८ कि.मी. ००/०० ते १/२०० मध्ये सुधारणा करणे.

लैंडवेचिंचाळे ते आंधळगाव रस्ता ग्रामा १३ कि.मी. ३/०० ते ४/०० व कि.मी. ५/०० ते ६०० मध्ये सुधारणा करणे.

कचरेवाडी ते गणेशवाडी रस्ता ग्रामा – २४६ कि.मी. ००/०० ते १/०० मध्ये सुधारणा करणे.

कागष्ट ते येड्राव रस्ता ग्रामा – ३१ कि.मी. ३/०० ते ५/०० मध्ये सुधारणा करणे.

भोसे ते आवताडेवाडी ते तालुका हद्द रस्ता ग्रामा – २६७ कि.मी. ००/०० ते ३/०० मध्ये सुधारणा करणे.

नंदेश्र्वर जातिहाळ भाळवणी मरवडे ते डोणज रस्ता इजिमा – ८५ कि.मी. १८/०० ते २३/०० ( मरवडे ते डोणज ) मध्ये सुधारणा करणे.

हुलजंती ते खवे ग्रा.मा. १०६ ( हुलजंती ते माळेवाडी ) कि.मी. ००/०० ते ४/०० मध्ये सुधारणा करणे.

हिवरगाव ते प्रजिमा – ७३ ला जोडणारा रस्ता ग्रामा – ७० कि.मी. ००/०० ते ४/०० मध्ये सुधारणा करणे.तसेच नाबार्ड कडून बावची गावा शेजारी असणाऱ्या ओढ्यावर पूल उभारणीसाठी यापूर्वी ३ कोटी ५० लाख निधी मंजूर केलेला होता. परंतु सदरील निधीमध्ये अपुरे काम होत असल्याने वाढीव निधी ५ कोटी २३ लाख मंजूर झालेला आहे.

# जळकोट व वागदरी येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

वागदरी/एस.के.गायकवाड : भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना तुळजापूर तालुक्यातील जळकोट व वागदरी येथे आभिवादन करण्यात आले.

जळकोट येथील युगपुरुष तरुण मंडळांच्या वत्तीन विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा ६७ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करून अभिवादन करण्यात आले



कार्यक्रमाच्या सकाळच्या सत्रामध्ये आंबेडकर चौकातील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन प्रकाश लोखंडे प्रदिप लोखंडे स्वदेश लोखंडे अरविंद लोखंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व मेणबती अगरबत्ती प्रज्वलीत करून करण्यात आले . व त्रिशरण पंचशिल घेण्यात आले.

त्यानंतर सायंकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अश्र्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण अरुण लोखंडे सतिश माने प्रदिप लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले आणि शिवाजी चौक ते भिमनगर आंबेडकर पुतळा ही एक की.मी.अंतरांची कॅन्डल मार्च काढण्यात आला .

आंबेडकर पुतळ्याजवळ कॅन्डल मार्च आल्यानंतर परमेश्र्वर लोखंडे जि . प चे माजी सदस्य गणेश सोनटके शिवाजी लोखंडे अंकूश लोखंडे यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले त्यानंतर बौद्ध उपासक उपासीका यांनी ६७ मेणबत्ती लावून बाबासाहेबाना अभिवादन करून आदराजंली अर्पण करण्यात आली . यावेळी शालेय मुला मुलींनी व काही प्रमुख मान्यवरांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विचार व्यक्त केले त्यावेळी मंडळाचे रितेश लोखंडे मुकेश लोखंडे युवराज लोखंडे लहू लोखंडे लक्ष्मण लोखंडे विशाल माने योगेश लोखंडे अविनाश लोखंडे सन्नी गायकवाड विनोद लोखंडे अशितोष भालेराव राजेश लोखंडे जीवन गुळे मलीनाथ माने सम्राट माने दमोदर लोखंडे गावातील प्रयाग मल्टी स्टेट बँकेचे अध्यक्ष सचीन कदम विजयकुमार मोरे सर कलाल सर ब्रम्हानंद कदम सह भिमनगर मधील बौद्ध उपासक उपासिका मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्यने उपस्थित होते

कार्यक्रमांच्या शेवटी शरतय गाथा घेवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यकमांचे सुत्रसंचलन आभार अरुण लोखंडे यांनी मानले.

तर वागदरी ता.तुळजापूर येथे ही महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने त्यांना आभिवादन करण्यात आले. यावेळी जेष्ठ कार्यकर्ते कुंडलिक वाघमारे, मोहन वाघमारे, एस.के.गायकवाड, अनिल वाघमारे, शिवाजी वाघमारे,चंद्रकांत वाघमारे, हणमंत वाघमारे,सादु वाघमारे,कलाप्पा वाघमारे, ग्रा. प.सदस्य अंकुल वाघमारे, इंदूबाई वाघमारे, गेंदाबाई वाघमारे सह महिला ग्रागस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यल्लमा देवीच्या मंदिरात पहाटे चोरी, चांदीची मूर्ती, पादुकांसह लाखोंचे दागिन्यांवर चोरांचा डल्ला

पंढरपूर/प्रतिनिधीः देशातील तृतीयपंथी आणि जोगतीण यांचे आराध्य म्हणून ओळख असणाऱ्या कासेगाव येथील यल्लमा देवीच्या मंदिरात पहाटे चोरी झाली. चोरांनी देवीच्या चांदीच्या मूर्ती आणि पादुकांसह जवळपास १० लाखांचे दागिने लांबवले असल्याचे समोर आले आहे. चोरीची घटना उघड होताच एकच खळबळ उडाली आहे. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी आता तपास सुरू केला आहे. या प्रकरणी चोरांना पोलिसांनी तातडीने अटक करावी अशी मागणी ग्रामस्थ आणि भाविकांनी केली आहे. या घटनेवर संताप व्यक्त केला जात आहे.




महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यातील तृतीयपंथी आणि जोगतीण यांचे आराध्य देवस्थान म्हणून ओळख असणाऱ्या कासेगाव येथील यल्लम्मा देवीच्या मंदिरात आज पहाटे चोरी झाल्याने खळबळ उडाली. चोरांनी देवीची चांदीची मूर्ती, चांदीच्या पादुका, चांदीची प्रभावळ असे जवळपास १० लाखांचे दागिने लंपास केले आहेत. या घटनेने भाविकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. पोलिसांनी तातडीने याचा तपास करून देवीचा ऐवज शोधावा अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

आज पहाटे दोन नंतर पुजाऱ्याच्या घराला बाहेरून कड्या लावण्यात आल्या आणि मागील दाराने आत येऊन चोरांनी दोन दरवाज्याची कुलुपे तोडून मंदिरात प्रवेश केला. या अज्ञात चोरांनी पहाटेच्या सुमारास ही चोरी केल्याचे पुजारी मुकुंद जाधव यांनी सांगितले. आज पहाटे पाच वाजता पुजारी मंदिरात आल्यावर त्यांना या घटनेचा उलघडा झाला. यानंतर तातडीने पुजाऱ्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोचले.

गेले काही दिवसांपासून मंदिराचे सीसीटीव्ही बंद आहेत. यात्रेपूर्वी हे सीसीटीव्ही दुरुस्त करून कार्यान्वित करण्याचे ठरले होते. मात्र त्या पूर्वीच ही चोरी झाल्याने कासेगाव परिसरात संतापाची लाट उसळली आहे. पहाटेच्या सुमारास सध्या कडाक्याची थंडी पडत असल्याने चोराने याचा फायदा घेतला. अतिशय जागृत असणाऱ्या या मंदिरात झालेल्या चोरीमुळे पोलीस खातेही खडबडून जागे झाले आहे. पोलिसांनी तपासासाठी विविध पथके तयार केले आहेत.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य आरोग्य शिबिर संपन्न

मुंबई : डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, मान्यता प्राप्त संस्था प्रसंग मागासवर्गीय समाज कल्याण संस्था जयपूर तालुका, जी. वाशीम, मैनाबाई सोनबा जी मानकर बहु.उधेशिय संस्था ,बेलोरा जी येवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने पंचशील मेडिकल असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी पार्क दादर मुंबई येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी येणाऱ्या अनुयायी यांच्या साठीभव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या शिबिराचे उदघाटन बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष राकेश जाधव ,सर जे जे हॉस्पिटल चे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी तथा महत्मा फुले जीवनदायी योजनेचे संचालक डॉ रेवत कनिंदे यांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गजपाल इंगोले ,अमोल सोनबाजी मानकर प्रशासन अधिकारी अंबरनाथ नगरपालिका यांच्या उपस्थितीत केले ,यावेळी भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भीम अनुयायांच्या तपासणी डॉ. चन्ने तालुका वैद्यकीय अधिकारी, डॉ.भूषण साखरे वैद्यकीय अधिकारी, डॉ.रुपाली तायडे स्त्री रोग तज्ञ,हिरानंदानी हॉस्पिटल , डॉ.विलास अहिरे ई. एस.आई .एस. डॉ.प्रतीक देहाडे दंत रोग तज्ञ, डॉ.नागेश सेजव संचालक पालवी हॉस्पिटल ,डॉ.आनंद इंगोले जन. फिजिशियान, डॉ.अभिजित वानखेडे वैद्यकिय अधिकारी,डॉ,धीरज पाटोळे भौतिक उपचार तज्ञ, डॉ.रमेश देवके जन. फिजीशियान,डॉ.दिलीप अहिरे नेत्र तज्ञ, डॉ.दिलीप पाटील नेत्र तज्ञ,डॉ.प्रशांत गायकवाड ई.एन टी ,डॉ . गोकुलदास अहिरे ई एन टी ,डॉ. बालाजी सातपुते अस्थी रोग तज्ञ यांनी तपासणी करून औषधे उपचार केले ,या वेळी डोळ्याची




तपासणी करून २५० क्या वर मोफत चास्म्याचे वितरण ज्येष्ठ सहितिक तथा निवृत्त सेल टॅक्स अधिकारी ,प्रमोद बचाव निवृत्त कस्टम कमिशनर ,मुंबई विद्यापीठ माजी रजिस्ट्रार एस. टी.मोरे, यांचे हस्ते केले,यावेळी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस चे डॉ चंद्रमुख ,डॉ वैशाली इंगळे व इतर सहकारी यांनी यावेळी स्टॉल ला भेट देणाऱ्या युवकांना सामाजिक जाणीव व त्यांचे कर्तव्य तसेच करिअर संदर्भात मार्गदर्शन केले ,यावेळी मोकळं साहेब जी एस टी उपायुक्त,बोराडे साहेब, मंडपे साहेब,हे उपस्थित होते .संस्थेच्या या उपक्रमाला अरविंद सोनटाते आई अर एस ,गायकवाड साहेब पोलिस अधिकारी यांनी भेट देऊन शुभेच्या दिल्या या उपक्रमाला सचिन गायकवाड ,शशिकांत भालेराव , अधिकारी अंबरनाथ नगरपालिका ,मोरे सामाजिक कार्यकर्ते हिंगोली,संदीप इंगोले वाशीम आड.सतीश पंडित वाशीम यांनी भेट देऊन उपक्रमाची प्रशंसा केली ,पंचशील मेडिकल असोसिएशन क्या बऱ्याच डॉक्टरांनी यावेळी आपली सेवा दिली पुढील वर्षी अजून चांगली सेवा देण्याची ग्वाही दिली

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज जिल्हास्तरीय सादरीकरण सत्र संपन्न

सोलापूर/प्रतिनिधी : शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्य सोसायटी, जिल्हा कौशल्य विकास उद्योजकता, रोजगार आणि नाविन्यता विभाग तसेच उद्यम इनक्यूबेशन केंद्र, पुण्यश्र्लोक अल्यिादेवी होळकर, विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्तविद्यमाने जिल्हास्तरीय सादरीकरण स्पर्धा आज सोलापूर विद्यापीठामध्ये संपन्न झाली.

स्पर्धेचे उदघाटन उपजिल्हाअधिकारी संतोषकुमार देशमुख व विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी उपजिल्हाधिकारी श्री देशमुख यांनी नाविन्यपूर्ण उद्योजकतेचे देशातील आणि जगातील महत्व अधोरेखित केले. राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतचे स्वप्न साकार करण्यसासाठी योग्य ते पाठबळ पुरवणे यासाठी शासनस्तरावर महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी कार्यरत असल्याचे सांगीतले. महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅजेंज या उपक्रमामध्ये येणाऱ्या काळात अधिकाधिक नवसकंकल्पना घेवुन जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग वाढवावा असे आवाहन उपजिल्हाधिकारी श्री.देशमुख यांनी उपस्थितांना केले. यावेळी डॉ. दामा यांनी विद्यापीठाचे इन्क्युबेशन केंद्र विविध संकल्पनांना साथ देईल अशी ग्वाही देऊन सहभागी स्पर्धकांना मार्गदर्शन केले.तत्पुर्वी सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास रोजगार हणमंत नलावडे आणि उद्योजकता विभाग यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली त्यामध्ये त्यांनी राज्यातील विद्यार्थ्यांना नवसंकल्पनांना मुर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमाचे अनावरण दि.१५ जुलै २०१३ रोजी मा.मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील शासकीय व खासगी विद्यापीठांच्या अधिपत्याखाली असलेल्या शेक्षणिक संस्था तसेच औद्योगिम प्रशिक्षण संस्थेतील नवउद्योजकांनी आपला सहभाग नोंदवला आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये शैक्षणिक संस्था स्तरावर प्रत्येकी उत्कृष्ट २ याप्रमाणे एकूण ३८ नवसंकल्पनांची निवड झाली असून, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत जिल्हास्तरीय सादरीकरणासाठी १२ नवसंकल्पना सादरीकरण घेण्याबाबत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत कळविण्यात आले असल्याचे सांगीतले. या सर्व स्पर्धकांचे जिल्हास्तरावर सादरीकरण सत्र बुधवार दिनांक ६ डिसेंबर २०२३ रोजी सोसायटीमार्फत देण्यात आलेल्या तज्ञ परिक्षकामार्फत घेण्यात आले. सोलापूर जिल्ह्यामधील नवसंकल्पना मांडणाऱ्या सर्व सहभागी खपर्पीर्री यांनी उत्कृष्ट प्रकारे सादरीकरण करावे. या १२ विद्यार्थ्यांना या वर्षी जिल्हास्तरीय सादरीकरण करण्यासाठी संधी मिळालेली नाही. त्यांनी पुढच्या वर्षी अधिक चांगल्या प्रकारे आपली नवसंकल्पना सादर करावी व भविष्यातही महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत आयोजित केलेल्या स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज सारख्या योजनांमध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त हणमंत नलावडे यांनी केले.विद्यापीठाच्या नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्या प्रभारी संचालिका डॉ. अंजना लावंड यांनी विद्यापीठाचे उद्यम इनक्युबेशन केंद्र आणि विद्यापीठ करत असलेला विविध योजनांची थोडक्यात माहिती दिली तसेच नाविन्यपूर्ण कल्पनांना विद्यापीठाचे इनक्युबॅशन केंद्र योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देईल यांची ग्वाही दिली.

# इतर मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तीकरीता कर्ज पुरवठा योजना

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळच्या वतीने मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत इतर मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींना स्वयंरोजगाराकरिता अत्यल्प व्याजदराने अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. याचा जास्तीत जास्त व्यक्तींनी लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत करण्यात आले आहे.इतर मागासवर्ग प्रवर्गाकरिता विविध कर्जपुरवठा योजना शासनाच्यावतीने राबविण्यात येत असून त्यामध्ये विना व्याज असलेली १ लक्ष रुपयेची थेट कर्जयोजना राबवली जाते.तसेच वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना राबवली जात असून मागासवर्गीय प्रवर्गातील कुशल व्यावसायिक व्यक्तींना व्यवसायाकरिता १५ लक्ष रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गट कर्ज व्याज परतावा योजनेत बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था अशा संस्थांना बँकेमार्फत उद्योग उभारणीकरिता कर्जपुरवठा करण्यात येणार आहे. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेत बँकेमार्फत लाभार्थीस व्यवसायासाठी १० लाख पर्यंत कर्ज वितरीत करण्यात येते.तसेच शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेत बँकेमार्फत विद्यार्थ्यास उच्च शिक्षणासाठी देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी १० लाख व परदेशी अभ्यासक्रमासाठी २० लाख रुपये इतके कर्ज वितरीत करण्यात येते. व्याज परतावा योजनेमध्ये बॅकेकडून घेतलेल्या कर्जाचे व्याज १२ टक्के पर्यत महामंडळाकडून अदा करण्यात येत आहे. यामध्ये सर्व राष्ट्रीयकृत बँक, खाजगी बँक तसेच सहकारी बँक तसेच सहकरी बँकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

इतर मागास प्रवर्गामधील गरजू व्यक्तींनी वरील कर्ज योजनांसाठी ऑनलाईन कर्ज अर्ज www.msobcfdc.org/msobcfdc.in या संकेस्थळावर दाखल करावेत.अधिक माहितीसाठी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयास संपर्क साधावा,

# पंढरी नगरीत होणार शिव महापुराण कथा : अभिजीत पाटील

## कथेचे अयोजन श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दि.२५ ते ३१ डिसेंबर २०२३

### पंडित प्रदीप मिश्रा यांचे भव्य शिव महापुराण कथा सोहळ्याचे मोठ्या उत्साहात होणार स्वागत





पंढरपूर/प्रतिनिधीः दि.०७.१२ .२०२३ रोजी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील यांनी पंढरपूर येथील आपले संपर्क कार्यालयामध्ये पत्रकार परिषद घेऊन वैकुंठ चतुर्थीच्या हरीहर भेटीचा सहयोग साधून श्रीक्षेत्र पंढरपूर येथील चंद्रभागा मैदान येथे पुजनीय पंडित श्री प्रदीपजी मिश्रा महाराज यांचे भव्य शिव महापुराण कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याचे जाहीर केले. सदरचा कथा सोहळा दुपारी ०१.०० ते ०४.०० या कालावधीमध्ये होणार आहे. सदर सोहळ्यास येणाऱ्या भाविकांच्या महाप्रसादाची व्यवस्था देखील केलेली आहे.

या धार्मिक कार्यक्रमाने नवीन वर्षाचे स्वागत होणार असून श्रीक्षेत्र पंढरपूर येथे या कथा सप्ताहास पंढरपूर शहरामध्ये आषाढी यात्रेप्रमाणे सुमारे १० लाखाच्या आसपास भाविक येणार असल्यामुळे पंढरपूराची आर्थिक उलाढाल वाढणार आहे. तसेच पंडित श्री प्रदीपजी मिश्रा महाराज यांचीही श्री विठ्ठलाच्या नगरीमध्ये कथा व्हावी अशी पुर्वीपासून इच्छा असल्याचे त्यांचे भाच्चे श्री.समीर यांनी सांगितले.यावेळी चेअरमन श्री अभिजीत पाटील म्हणाले की, या धार्मिक कार्यक्रमामुळे पंढरपूर धार्मिक पर्यटन केंद्र करण्याचा नवीन संकल्प असल्याचे सांगितले. याबरोबरच पंढरपूर शहर व आसपासच्या भागातील देवतांची पुरातन ऐतिहासिक मंदिरे यांची माहिती या सोहळ्याच्या ठिकाणी ठेवणार असल्यामुळे सर्व भाविक भक्तांना संपुर्ण पंढरपूर शहर व परिसराची देवतांची इथंभूत माहिती मिळणार असून तेथील देवस्थानच्या गांवाचीही आर्थिक उलाढाल वाढणार असल्याचे सांगितले.

पंडित श्री प्रदीपजी मिश्रा महाराज यांचे २४ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आगमन होणार असून श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास भेट देवून पंढरपूर येथे आगमन झालेनंतर श्री विठ्ठल रूक्मिणीचे दर्शन घेवून शहरामध्ये त्यांची प्रदक्षिणा मार्गावरून भव्य शोभा यात्रा काढण्यात येणार आहे.

यावेळी पंढरपूर व परिसरातील भाविक भक्तगणांना, नागरिकांना सदर कथा सोहळ्याचा लाभ घेणेसाठी श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील यांनी आवाहन केले.

# मकाई कारखान्याच्या थकीत ऊस बिलासाठी थू थू आंदोलनं



करमाळा/प्रतिनिधी : मकाई सहकारी साखर कारखान्याच्या थकीत ऊस बिलासाठी १५ टक्के व्याज सहीत मिळावे या मागणीसाठी आज करमाळा तहसील कार्यालयासमोर थू थू आंदोलनं करण्यात आले या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते या आंदोलनाच्या वेळी शेतकरी कामगार संघटनेचे अध्यक्ष दशरथ आण्णा कांबळे प्रा रामदास झोळ सर पंचायत समितीचे सदस्य राहुल सावंत शेतकरी संघटनेचे रविंद्र गोडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी कांबळे यांनी आपल्या भाषणामध्ये म्हणाले की जो पर्यंत शेतकरच्या खामा चा पै पै रुपये या साखर सम्राटांच्या कडून वसूल केल्या शिवाय गप्प बसणार नाही या वेळी प्रा झोळ यांनी आपल्या भाषणामध्ये करमाळा तालुक्यातील आजी माजी आमदार यांनी तालुक्यातच वाटूळ केले आहे हे आपल्याला राजकीय फायद्यासाठी कधी ही एकत्र येतात पण यांना शेतकरयांसाठी वेळ नाही या वेळी सावंत यांनी आपल्या भाषणामध्ये म्हणाले की जो पर्यंत शेतकरच्या पैसा न पैसा मिळत नाही तोपर्यंत राहुल सावंत तुमच्या सोबत आहे असं आश्र्वासन सावंत यांनी या वेळी दिल या आंदोलनाला उपस्थित शेतकरी यांनी पानं घाऊन तात्कालीन चेअरमन बागल यांच्या पुतळ्या वर थूकन्यात आलं

# जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उदघाटन संपन्न




अक्कलकोट/प्रतिनिधीः गौडगाव बु!!(ता.अक्कलकोट) येथील श्री जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत अक्कलकोट बीटस्तरीय प्राथमिक क्रीडा स्पर्धा उत्साहात प्रारंभ झाला असून प्रथम संस्थेचे प्रतिनिधी योगीराज हिरेमठ यांच्या हस्ते प्रथम महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले व उपस्थित सर्व केंद्रप्रमुखांचे हस्ते दीप प्रज्वलन. मैदान पूजन. करून स्पर्धेला प्रारंभ झाले यावेळी क्रीडा स्पर्धेचे प्रास्ताविक व स्वागत श्री पुंडलिक कलखमकर.व परमेश्र्वर होसुरे. यांनी केले यावेळी व्यासपीठावर प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी केंद्र प्रमुख भीमाशंकर धडके. सुरेश शटकार बसवराज गौडनळी. गुरुनाथ नरोने .क्रीडा शिक्षक गणपती पवार .राजेंद्र पवार रेणुकाचार्य हिरेमठ .संतोष चिंचोळे .प्रवीणकुमार जाधव. कल्याणी गंगोंडा .बसवराज सक्करगी.अविनाश भैरूनगी श्याम सुंदर भुजबळे. बापू वाघमोडे. सत्यवान जैन जांगडे बसवराज खिलारी. सिद्धाराम तेगगेली. विद्याधर गुरव . शरणाप्पा फुलारी .सोमनाथ कुंभार. इरप्पा गजा गुंडराव पोतदार. व कडबगाव. उडगी .तोळणुर. दुधनी. नागणसूर या केंद्रातील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते विजेत्या संघांना जेऊरवाडी चे नूतन सरपंच कमलाबाई गोपीचंद राठोड यांच्याकडून ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सर्व केंद्रातील शिक्षकांचे सहकार्य लाभले. शेवटी विस्तार अधिकारी श्री वाले सरांनी. क्रीडा स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिले.

# सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने अखंड १८ तास अभ्यास अभिवादनाचा उपक्रम

अक्कलकोट/प्रतिनिधीः विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना १८ तास अभ्यास करून अभिवादन सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने सी,बी खेडगी महाविद्यालयात उपक्रम

६ डिसेंबर रोजी विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अखंड १८ तास अभ्यास करून ११४ विद्यार्थ्यांनी अभिवादन केले. विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सी,बी खेडगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.अंधारे सर यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ग्रंथालय प्रमुख कांबळे सर, डॉ.किशोर थोरे सर, प्रा.आबाराव सुरवसे सर, प्रा.विठ्ठल वाघमारे सर, प्रा.गणपतराव कलशेट्टी सर, सम्यक विद्यार्थी आंदोलन मा.तालुका अध्यक्ष रविराज पोटे, रोहित उघडे, गंगाराम वाघमारे, साहिल कांबळे, आदीसह विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभिवादनाच्या उपक्रमाला सकाळी ६ वाजता सुरुवात करण्यात आली या उपक्रमात ११४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आणि विद्यार्थ्यांसाठी फळ, चहा, नाश्ता व जेवणाची सोय करण्यात आली होती व रात्री १२ वाजता अभिवादन करून समारोप करण्यात आले,

# जिल्ह्याच्या विकासात उद्योगांचे महत्त्वपूर्ण योगदान : जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे



धाराशिव/प्रतिनिधी : राज्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या एम एस एम इ क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार बेरोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यासाठी तसेच उद्योगाच्या विकासासाठी राज्य तसेच केंद्र शासनाचे विविध विभाग यांचे उपक्रम व योजना उद्योग संचालनालया मार्फत राज्यात राबविले आहेत. या योजनांची माहिती उद्योजकांना एकाच वेळी उपलब्ध होण्यासाठी सर्व विभागांच्या सहकार्याने धाराशिव येथे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षते खाली एक दिवशीय कार्यशाळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी उद्योजकांना या कार्यशाळेमार्फत दिल्या जाणाऱ्या योजनांच्या माहितीचा लाभ घेऊन आपले उद्योग सुरू करावे आणि जिल्ह्याच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देऊन आपले सरासरी उत्पन्न वाढवावे असे आवाहन केले. तसेच या कार्यशाळेत छ. संभाजी नगरचे उद्योग सहसंचालक बी.टी यशवंते, यांनी उद्योग विभागाच्या सर्व योजनांची माहिती दिली. यामध्ये मैत्री कायदा CMEGP, PMEGP, क्लस्टर, पायाभूत सुविधा योजना सामूहिक प्रोत्साहन योजना, SMS, DIC,LOIN, योजना आदी योजनांचा लाभ घेऊन स्वयंरोजगार सुरू करावा असे आव्हान केले. या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून सिडवी, अपेडा, ओ एन डी सी, डी जी एफ टी ई अँड वाय कन्सल्टन्सी यांचे प्रतिनिधी व बँक ऑफ महाराष्ट्र चे जिल्हा समन्वयक यांनी CGTMSE, बाबत माहिती दिली. यावेळी सूक्ष्म लघु मध्यम उपक्रम घटक निर्यातदार, निर्यात क्षम उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह शेतकरी सहकारी संस्था, व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे, तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचारन समितीचे सदस्य, निर्यात संबंधी कामकाज करणारे घटक यांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळेचा समारोप प्रसंगी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांनी उपस्थित त्यांचे आभार मानले.

# जयपाल काणे यांचा सत्कार



टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील भारतीय जनता पार्टी टाकळीवाडी शाखा अध्यक्ष जयपाल काणे यांची ५ डिसेंबर २०२३ रोजी जैन प्रकोष्ट कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष म्हणून त्यांची निवड करण्यात आली. कार्यकर्ता ते कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष या पदापर्यंत त्यांनी मजल मारलेली आहे. यावेळी सत्कार करताना विट उद्योजक संजय कुंभार, माजी सुभेदार संजय बदामे, अमित राजमाने, संजय बदामे,कु. राजनंदिनी निर्मळे, जिल्हा परिषद पुरस्कार प्राप्त विजेती कु.शौर्या निर्मळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# पंढरपूर तालुक्यातील प्रत्येक गावात दहा कॅमेरे बसवणार

## पंढरपूर तालुका पोलीस पाटलाच्या बैठकीत पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांच्या सूचना



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यांमध्ये विविध गावांमध्ये सण उत्सव यात्रा महापुरुषांची जयंती या अनुषंगाने प्रत्येक गावामध्ये दहा सीसीटीव्ही कॅमेरे यांच्या माध्यमातून नजर ठेवण्याची सूचना पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे नूतन पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांनी तालुका पोलीस ठाण्यातील सर्व पोलीस पाटलांना सूचना दिल्या. बैठकीत त्यांनी सुरक्षा व कार्यपद्धतीवर यांत्रणेवर सुधारित माहिती दिली पोलीस पाटलांनी ग्रामपंचायत व एन्जॉय च्या मदतीने ग्रामपंचायतच्या सुरवातीच्या ठिकाणी प्रवेशाच्या ठिकाणी महत्वाच्या चौकात व गर्दीच्या ठिकाणी अशाप्रकारे ठिकाणी दहा सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे आवाहन केले सध्या सकल मराठा समाज व धनगर समाज ओबीसी आंदोलनाच्या आंदोलनावर कशाप्रकारे काम केले पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले मी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कशाप्रकारे अक्षदा घेतली गेली पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. याबाबत गावामध्ये फ्लेक्स बॅनर यांची दक्षता घेतली पाहिजे गोळी गावामध्ये चांगले काम करणाऱ्या पोलीस पाटलांचा सत्कार ही करण्यात आला.पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचा चार्ज घेतल्यानंतर आपल्या कामाची पद्धत व गुन्हेगारावर वाचक बसवण्यासाठी नूतन पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांनी सुरुवात केली

# महाराष्ट्र विधान परिषदेची कामगिरी पुढील पिढीसाठी मार्गदर्शक : मुख्यमंत्री



नागपूर : महाराष्ट्र विधान परिषदेचे कामकाज पुढील पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहे. परिषदेतील चर्चा या देशाला नेहमीच मार्गदर्शक ठरल्या आहेत. या सकारात्मक चर्चांच्या माध्यमातून राज्याच्या विकासाला चालना देऊ या, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.विधान परिषद सभागृहात महाराष्ट्र विधान परिषद शतक महोत्सवानिमित्त 'महाराष्ट्र विधिमंडळ संसदीय वाटचालीत हिवाळी अधिवेशनाचे योगदान' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, राजेंद्र गवई यांच्यासह विधान परिषद सदस्य, ज्येष्ठ पत्रकार उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, परिषद सभागृहामध्ये विचार मांडण्याची मुभा असते. जनतेला न्याय देणे, त्यांचे प्रश्र्न सोडविण्यासाठी आपण सभागृहात येतो. महाराष्ट्र सर्व क्षेत्रासोबतच संसदीय कार्यप्रणालीमध्येही अग्रेसर आहे. ऐतिहासिक वास्तूमध्ये होत असलेला आजचा हा शतक महोत्सवी कार्यक्रम ऐतिहासिक आहे. राज्याची संसदीय परंपरा ही वैभवशाली असून जगाने गौरवलेली आहे. या परंपरेमध्ये नागपूरचे हिवाळी अधिवेशन हे संसदीय परंपरा समृद्ध करणारे असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.

या अधिवेशनाच्या माध्यमातून जनतेला न्याय देण्याचे, त्यांचे प्रश्र्न सोडवण्याचे काम करायचे आहे. या अधिवेशनाच्या माध्यमातून राज्याच्या विकासाची बेरीज करु या. विदर्भातील जनतेला या अधिवेशाकडून अनेक अपेक्षा आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी सर्वांनी काम करू या. सर्वांनीच हे अधिवेशन गांभीर्याने घ्यावे. या अधिवेशनाच्या माध्यमातून विदर्भातील सर्वसामान्यांना न्याय मिळावा ही आमची भावना आहे. विदर्भाला जोडणारे माध्यम हीच या अधिवेशनाची मोठी उपलब्धता असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, राज्याला महर्षी कर्वे, महात्मा जोतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची समाजप्रबोधनाची मोठी परंपरा लाभलेली आहे. त्यांच्या योगदानामुळेच राज्यात शिक्षण चळवळ यशस्वी झाली आहे. समाजप्रबोधनाची ही परंपरा जपण्याचे काम विधान परिषदेच्या माध्यमातून होत आहे. विधान परिषदेच्या आजपर्यंतच्या वाटचालीविषयी लवकरच पुस्तकही प्रकाशित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी विधान परिषदेच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला.

विधान परिषदेचे महत्व सांगताना विरोधी पक्षनेते श्री. वडेट्टीवार म्हणाले की, परिषदेमुळे शिक्षक, पदवीधर, लेखक, कवी, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, खेळाडूंना प्रतिनिधित्व मिळाले आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते श्री. दानवे यांनी चर्चासत्राच्या कार्यक्रमास शुभेच्छा देताना या अधिवेशनाचे सर्वांनाच कुतुहल असल्याचे सांगितले. चर्चासत्रामध्ये नागपूरमधील ज्येष्ठ पत्रकारांनी तसेच विधान परिषद सदस्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमावेळी ज्येष्ठ पत्रकार व सदस्यांना मुख्यमंत्री श्री शिंदे व उपसभापती डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यातआले.